# पेप्सीकोने बनविले यंगीस्तानसाठी आगळेवेगळे राष्ट्रगीत

## युवकांनी युवकांसाठी युवकांवर तयार केलेले अभिनव राष्ट्रगीत

## संगीतकार विशाल व शेखर यांचा नवा आविष्कार

मराठमोळ्या भाषेत तुमच्या स्वतःची ओळख सांगणारं गाणं तुम्ही कधी ऐकलं आहे का? असे गीत की जे अगदी तुम्हाला स्वतःचं वाटावं .. ज्यात स्वतःचं प्रतिबिंब उमटावं . . . जे ऐकल्याने आश्चर्याचा सुखद अनुभव मिळावा. . .होय असे तरुणाईचे नवे गीत तुम्हाला आता ऐकायला मिळणार आहे.

तरुणाईचे यंगीस्तानचे असे नवे गीत पेप्सीने आज त्यांच्या अभिनव प्रसारमोहिमेत सादर केले. ते यंगीस्तानचे राष्ट्रगीतच म्हणावे लागेल. यंगीस्तान का वॉव अशा काव्यपंक्तींनी सजविलेल्या याँ गीताला संगीत दिले आहे विशाल आणि शेखर या लोकप्रिय संगीतकारांनी. यंगीस्तानच्या या गीतासाठी आयोजित केलेल्या संगीत रजनीच्या महाअंतीम फेरीत वॉव या शब्दाचा मधूर वाणीने उच्चार करणाऱ्या स्पर्धकांनी रंग भरला.

युवकांना शब्द वाक्प्रचार आणि म्हणींच्या आधारे सादरीकरण करण्याची संधी त्यांना देण्यात आली. यंगीस्तान का वॉव ही त्याची मूळ संकल्पना होती. या मोहिमेला हजारो युवकांनी भरभरून प्रतिसाद दिला. यंगीस्तानच्या गीतरचनेतच नव्हे तर त्याच्या संगीत निर्मितीतही ते सामील झाले. स्वतःच तयार केलेले हे युवागीत स्फूर्ती देणारे राष्ट्रगीत विशाल आणि शेखर या संगीतकारांसमवेत ऐकतांना हे युवक भारावून गेले.

पेप्सीच्या या अभिनव उपक्रमाबद्दल बोलतांना कोला पेप्सीको इंडियाच्या मार्केटिंग विभागाचे कार्यकारी उपाध्यक्ष संदीप सिंग अरोरा म्हणाले की, यंगीस्तान का वॉव हा युवकांचा आवाज आहे. त्यात युवकांची कल्पकता, नाविन्यपूर्ण संकल्पना, त्यांची मते ,त्यांचा स्वभाव, त्यांचे ज्ञान आणि हालचाली याचे प्रतिबिंब उमटले आहे. देशभरातील तरुणांच्या नसानसात भिनलेले ते एक महान काव्य आहे. तरुणांना प्रेरणा देणारे हे गाणे प्रत्येक तरुण गुणगुणतांना दिसतो आहे. हजारो स्पर्धकांनी भाग घेऊन पेप्सीच्या ब्रॅण्डवर आपला नितांत विश्वास असल्याचे दाखवून दिले आहे. त्यांनी सादर केलेल्या भावना याच पेप्सीच्याही भावना आहेत.

संगीतकार विशाल आणि शेखर याबाबत बोलतांना म्हणतात की, पेप्सी जेव्हा त्यांची ही अभिनव संकल्पना घेऊन आमच्याकडे आले तेव्हा आम्ही भारावूनच गेलो. यंगीस्तान का वॉव हे गीत एका दिवसात तयार करतांना आम्हीच आश्चर्यमय झालो. लक्षावधी युवकांच्या भावना त्यांचे विचार एकाच गाण्यात आणि तेही एका दिवसात सादर करण्याचा अनुभव आम्हाला आनंददायी ठरला.

पेप्सीचे ब्रॅण्ड ॲम्बेसेडर रणबीर कपूर म्हणाले की, युवकांच्या या राष्ट्रगीतात त्यांच्या भावनांचे खरेखुरे प्रतिबिंब उमटले आहे. हे गीत म्हणजे त्यांचा आविष्कार आणि स्वातंत्र्य याचे प्रतिक आहे. वॉव या शब्दासारखे खरोखरीच कुतुहल वाढविणारे असे हे गीत आहे. युवकांनी युवकांसाठी तयार केलेले हे अफलातून गीत म्हणजे यंगीस्तानला वाहिलेले पुष्पच आहे. वॉव या शब्दातून त्यांचे प्रेम,मैत्री,त्यांची स्वप्ने अणि प्रेरणा यांचा अनोखा अनुभव मिळतो.

यंगीस्तान का वॉव ही अभिनव संकल्पना आता हाय डेसीबलवरुन सादर केली जाईल. डिजिटलच्या माध्यमातून त्याचा प्रचार केला जाईल. ज्याला त्याला ऑनलाईन ही संकल्पना पाहायला मिळेल. अवकाशात आणि भूप्रदेशावर सतत ही संकल्पना लोकांपर्यंत पोहोचविली जाईल.